# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.08.2025** **वार-सोमवार**

---

## कुंडेश्वर अपघात

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात वाहन १०० फूट खोल दरीत कोसळून झालेल्या अपघातामध्ये आठ जणांचा जागीच मृत्यू झाला; तर 29 जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त गाडीतील भाविक महिला तिसऱ्या श्रावणी सोमवारनिमित्त कुंडेश्वराच्या दर्शनाला जात होत्या. या दुर्घटनेतील जखमींना खासगी रुग्णालय आणि चांडोली ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं असून काहींची प्रकृती गंभीर आहे. या दुर्घटनेबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केलं असून पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 2 लाख रुपयांची तर जखमींना प्रत्येकी 50 हजार रुपयांची मदत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या दुर्घटनेबद्दल दु:ख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारतर्फे 4 लाख रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली आहे.

## महागाई भत्ता

राज्य सरकारनं कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दोन टक्के वाढ केली आहे. राज्य सरकारमध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना तसंच निवृत्ती वेतन धारकांना आता ५३ ऐवजी ५५ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जानेवारीपासून या महागाई भत्त्याची थकबाकीही ऑगस्टच्या वेतनाबरोबर दिली जाईल. यासंदर्भातला शासन आदेश सरकारनं आज जारी केला.

## हरघरतिरंगा

येत्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका येत्या बुधवारी ‘हर घर तिरंगा’ अभियान राबवणार आहे. तसंच महापालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते माजी सैनिकांना सन्मानित करण्यात येणार आहे. या निमित्ताने देशभक्तीपर हिंदी, मराठी गीतांचा ‘माँ तुझे सलाम’हा विशेष कार्यक्रमही होणार आहे. पुणेकर रसिकांसाठी हा कार्यक्रम विनामूल्य खुला असून रसिकांनी कार्यक्रमाला उपस्थित रहावं असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

## औद्योगिक वीज दरकपात

महावितरणनं औद्योगिक वीज दरात कपात केली असून दरवर्षी सरासरी १ पूर्णांक ९ टक्के या प्रमाणे पुढच्या पाच वर्षांमध्ये १० टक्के दर कमी होतील, असं महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी म्हटलं आहे. पुण्यात गणेशखिंड इथल्या महावितरणच्या प्रादेशिक संचालक कार्यालयात शहरातील उद्योजक संघटनांसमवेत आज लोकेश चंद्र यांनी संवाद साधला. दरम्यान, पुण्यातील उद्योजकांची विजेची वाढती मागणी लक्षात घेता, महावितरणने एमआयडीसीकडे नवीन वीज उपकेंद्रांसाठी जागेची मागणी केली आहे.

## आवास योजना

पुणे शहरातील प्रत्येकाला हक्काचं घर मिळावं, यासाठी पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून धानोरी, हडपसर, बाणेर, कोंढवा, बालेवाडी, तसंच वडगाव खुर्द या पाच भागांत ४ हजार ७७३ घरं बांधण्याचं नियोजन पुणे महापालिकेनं केलं आहे. त्यासाठी आतापर्यंत ७ हजार ६०० जणांचे अर्ज आले आहेत.

**pcmc**

मालमत्ता कराची थकबाकी नसल्याचा दाखला नागरिकांना घरबसल्या मिळावा यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेने ऑनलाईन सुविधा सुरू केली आहे. यावर्षी १ एप्रिल ते ३१ जुलै या कालावधीत १३ हजार २१३ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घेतला असल्याचं कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितलं.

**प्रदर्शन**

फोटोग्राफी सोसायटी ऑफ पुणे या संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त पुण्यात फोटो फेस्ट प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. याचं उद्घाटन ज्येष्ठ छायाचित्रकार सतीश पाकणीकर यांच्या हस्ते करण्यात आलं. येत्या १३ ऑगस्टपर्यंत बालगंधर्व कलादालनात हे प्रदर्शन खुलं असेल, रोज संध्याकाळी विविध मान्यवरांचं व्याख्यानही होणार आहे, छायाचित्रण क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्यांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी असं आवाहन आयोजकांनी केलं आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिका बाणेर, वाकड, कात्रज, शेवाळवाडी आणि वाघोली या शहराच्या पाच प्रमुख प्रवेशद्वारांवर सुमारे ४ कोटी ३१ लाख रुपये खर्च करून वातानुकूलित स्वच्छतागृहं उभारणार आहे. मात्र बाहेरगावाहून शहरात येणाऱ्या नागरिकांना वातानुकूलित नव्हे तर स्वच्छ आणि पाण्याची पुरेशी सोय असलेल्या स्वच्छतागृहांची अधिक गरज असल्याचं मत सजग नागरिक मंचाचे अध्यक्ष विवेक वेलणकर यांनी व्यक्त केलं आहे.

**क्रीडा**

आंध्र प्रदेशातील काकीनाडा इथं महिलांच्या कनिष्ठ गटाच्या १५व्या हॉकी इंडिया राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा सुरू आहेत. या स्पर्धेत अंतिम आठमध्ये महाराष्ट्र संघानं स्थान पटकावलं होतं, मात्र, आज सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यात हॉकी महाराष्ट्राला हॉकी उत्तर प्रदेशविरुद्ध १-२ असा पराभवाचा धक्का बसला. या पराभवामुळे महाराष्ट्राचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३१ आणि किमान तापमान २२ पूर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**